खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी मा. देवेंद्रजी बुट्टे पाटील साहेब यांची एकमताने सातव्यांदा निवड

प्रभात

खेड शिक्षण प्रसारकच्या अध्यक्षपदी सातव्यांदा ॲड. बुट्टे पाटील

राजगुरुनगर, दि. १४ (प्रतिनिधी) - खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची सातव्यांदा एकमताने निवड करण्यात आली. संस्थेच्या प्रगतीची धुरा गेल्या पंचवीस वर्षांपासून समर्थपणे सांभाळणार्या ॲड. बुट्टे पाटील यांच्या नेतृत्वावर सभासदांनी पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केला.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील हे सन २००१ पासून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. पुढील पंचवार्षिक कालावधीसाठी त्यांची एकमताने

राजगुरुनगर : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची निवड झाल्यानंतर त्यांचा सत्कार करताना आमदार बाबाजी काळे व मान्यवर.

निवड झाल्याने सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. अध्यक्ष निवडीचा ठराव प्रकाश पाचारणे यांनी मांडला, तर माणिक भांबुरे यांनी अनुमोदन दिले. तसेच संस्थेची कार्यकारिणी निवडण्याचे अधिकार अध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टे पाटील यांना देण्यात आले. यावेळी आमदार बाबाजी काळे, जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे, अनिल राक्षे, एस. पी. देशमुख, दशरथ ढोबळे यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक व सभासद उपस्थित होते. अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आमदार बाबाजी काळे यांनी सर्व सभासदांच्या वतीने ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांचे अभिनंदन केले. खेड तालुक्याच्या शैक्षणिक विकासासाठी संस्थेला सहकार्य करण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून संस्थेच्या नवीन महाविद्यालयासाठी इमारत उभारण्यासाठी प्रयत्न करणार असून, खेड तालुक्यात संस्थेच्या माध्यमातून वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून आणण्यासाठीही प्रयत्नशील राहणार असल्याचे आमदार काळे यांनी सांगितले.

पुनर्निवडीबद्दल सभासदांचे आभार मानताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सभासदांनी व्यक्त केलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संस्थेच्या विकासाची वाटचाल अधिक व्यापक करताना सर्व सभासद, संस्थेच्या विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक तसेच शिक्षकेतर सेवकांना सोबत घेऊन कारभार पारदर्शक पद्धतीने पुढे नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. बदलत्या काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी नर्सिंग महाविद्यालय आणि अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सभेचे अहवाल वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. संचालक हिरामण सातकर यांनी आभार मानले.

Pune Gramin Edition
Sep 15, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

पुढारी

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

• सलग सातव्यांदा एकमताने निवड

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र साहेबराव बुट्टे पाटील यांची सातव्यांदा एकमुखाने निवड करण्यात आली. शनिवारी (दि. १२) झालेल्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही घोषणा करण्यात आली.

संस्थेच्या प्रगतीची धुरा गेल्या २५ वर्षांपासून समर्थपणे सांभाळणाऱ्या ॲड. बुट्टे पाटील यांच्या नेतृत्वावर सभासदांनी पुन्हा एकदा विश्वासाने शिक्कामोर्तब केले.

तालुक्याचे प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि चतुरस्र वक्ता म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो असे दिवंगत माजी आमदार ॲड. साहेबराव बुट्टे पाटील यांचे चिरंजीव असलेले ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील हे सन २००१ पासून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. पुढील पंचवार्षिक कालावधीसाठीही त्यांची अध्यक्षपदी एकमुखाने निवड झाल्याने सभासदांनी समाधान व्यक्त केले. या वेळी आमदार बाबाजी काळे, जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे पाटील, अनिलबाबा राक्षे, एस. पी. देशमुख, दशरथ ढोबळे यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षनिवडीचा ठराव प्रकाश पाचारणे यांनी मांडला, तर अनुमोदन माणिक भांबुरे यांनी दिले. संस्था कार्यकारिणी निवडण्याचे अधिकार अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांना देण्यात आले. सभेचे अहवालवाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. संचालक हिरामण सातकर यांनी आभार मानले.

देवेंद्र बुट्टे पाटील यांचा सत्कार करताना आ. बाबाजी काळे व अन्य मान्यवर.

Pune Gramin Edition
Sep 13, 2026 Page No. 4
Powered by: erelego.com

लोकमत

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करताना आमदार बाबाजी काळे व मान्यवर.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. बुट्टे

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची सातव्यांदा एकमुखाने निवड करण्यात आली. संस्थेच्या प्रगतीची धुरा गेल्या पंचवीस वर्षांपासून समर्थपणे सांभाळणाऱ्या ॲड. बुट्टे पाटील यांच्या नेतृत्वावर सभासदांनी पुन्हा एकदा विश्वासाने शिक्कामोर्तब केले.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील हे २००१ पासून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आहेत. जि.प. सदस्य विजयसिंह शिंदे, अनिल राक्षे, एस.पी.देशमुख, दशरथ ढोबळे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडीचा ठराव प्रकाश पाचारणे यांनी मांडला अनुमोदन माणिक भांबुरे यांनी दिले. कार्यकारिणी निवडीचे अधिकार अध्यक्ष ॲड. बुट्टे पाटील यांना देण्यात आले.

निवडीबद्दल आमदार बाबाजी काळे यांनी ॲड. बुट्टे पाटील यांचे अभिनंदन करून त्यांचे खेड तालुक्याच्या शैक्षणिक विकासाचे योगदान स्पष्ट केले. सीएसआर फंडातून नवीन महाविद्यालयासाठी इमारत उभारण्यासाठी प्रयत्न करणार असून, वैद्यकीय महाविद्यालय मंजूरीसाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. ॲड. बुट्टे पाटील यांचे सभासदांच्या विश्वासाबद्दल आभार मानून नर्सिंग कॉलेज आणि इंजिनिअरिंग कॉलेज सुरू करण्याचे मानस व्यक्त केले. अहवालवाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. संचालक हिरामण सातकर यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Sep 13, 2026
Powered by: erelego.com

दैनिक भास्कर
BhaskarHindi.com

देवेंद्र बुट्टे पाटिल सातवीं बार अध्यक्ष निर्वाचित

भास्कर न्यूज | राजगुरुनगर . खेड़ तालुका शिक्षण प्रसारक मंडल की 52वीं वार्षिक आमसभा में वर्ष 2026 से 2031 तक के पांच वर्षीय कार्यकाल के लिए एड. देवेंद्र बुट्टे पाटिल को सातवीं बार सर्वसम्मति से अध्यक्ष चुना गया। पिछले 25 वर्षों से संस्था की प्रगति का नेतृत्व कर रहे बुट्टे पाटिल पर सदस्यों ने एक बार फिर विश्वास जताया है। एड. देवेंद्र बुट्टे पाटिल वर्ष 2001 से खेड़ तालुका शिक्षण प्रसारक मंडल के अध्यक्ष पद की जिम्मेदारी संभाल रहे हैं। आमसभा में विधायक बाबाजी काले, जिला परिषद सदस्य विजय सिंह शिंदे, एस. पी. देशमुख, दशरथ ढोबले सहित संस्था के सभी संचालक और बड़ी संख्या में सदस्य उपस्थित थे। अध्यक्ष पद के निर्वाचन का प्रस्ताव प्रकाश पाचारणे ने रखा, जिसका अनुमोदन माणिक भांबुरे ने किया। इस दौरान संस्था की आगामी कार्यकारिणी का गठन करने के अधिकार भी अध्यक्ष एड. देवेंद्र बुट्टे पाटिल को सौंपे गए।

तरुण भारत
Pune Main | 2026-09-15 | Page- 2
epaper.tarunbharat.net

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

राजगुरूनगर: खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची सातव्यांदा एकमुखाने निवड करण्यात आली. संस्थेच्या प्रगतीची धुरा गेल्या पंचवीस वर्षांपासून समर्थपणे सांभाळणाऱ्या ॲड. बुट्टे पाटील यांच्या नेतृत्वावर सभासदांनी पुन्हा एकदा विश्वासाने शिक्कामोर्तब केले. बुट्टे पाटील हे सन २००१ पासून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. यावेळी आमदार बाबाजी काळे, जि.प. सदस्य विजयसिंह शिंदे, अनिल राक्षे, एस.पी.देशमुख, दशरथ ढोबळे, नानासाहेब टाकळकर, हिरामण सातकर यांच्यासह अदीची उपस्थिती होती. अध्यक्ष निवडीचा ठराव प्रकाश पाचारणे यांनी मांडला तर अनुमोदन माणिक भांबुरे यांनी दिले.

Powered by Bharati Web

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख